# अष्टावरण
# पंचाचार
# षट्स्थल

प्रा.डॉ. शशीकांत दर्गू यांना सस्नेह

भि.शि. स्वामी

२६/११/२४

# अष्टावरण

# पंचाचार

# षटस्थल

**प्रा. डॉ. भि.शि. स्वामी**

अष्टावरण पंचाचार षटस्थल

© सौ.विजया भिमाशंकर स्वामी

प्रकाशक:
प्रा. डॉ. भि.शि. स्वामी
डी-६, सोबा ऑप्टिमा, माणिकबाग, सिंहगड रस्ता,
पुणे - ४११०५१ मो. ९६२३३४८९२१

मुखपृष्ठ व पुस्तक मांडणी : जंगम कलामुद्रण

मुद्रक:
जंगम ऑफसेट
सर्व्हे नं.१०, कैलास जीवन कंपनीशेजारी, धायरी,
पुणे - ४११०४१ फोन.९८५०७९७००८

प्रकाशन दि:
१२ ऑक्टोबर २०२४ (विजयादशमी शके १९४६)

मूल्य: रूपये ५०/-

मातोश्री भागीरथीबाई
आणि
पिताश्री शिवय्या स्वामी सोनेसांगवीकर
यांच्या पावन स्मृतीस अर्पण

## अष्टावरण :

आवरण म्हणजे झाकण. किंवा अच्छादन. अच्छादना मुळे ते ज्याच्यावर झाकलेले असते, त्याचे संरक्षण होते. वीरशैवांची अष्ट म्हणजे ही आठ अवरणे वीरशैवांचे संरक्षक कवच असतात. अनिष्टापासून संरक्षण देण्याच्या कामी यांचा उपयोग होतो. अनिष्टापासून म्हणजे काम, क्रोध, मद इत्यादि षड्रिपूपासून हे संरक्षण असते. अर्थात ही अवरणे वीरशैव दिक्षा घेतलेल्या भक्तांचे या अशा षड्रिपूपासून संरक्षण करीत असतात. त्यामुळे दिक्षा घेतलेल्या भक्ताला ही अवरणे त्याच्या मोक्षाच्या मार्गात सहाय्यभूत ठरतात.

मन्मथ स्वामींनी अष्टावरणांची नोंद आपल्या एका



अभंगात खालील प्रमाणे केल आहे.

*गुरू आणि लिंग जंगमाची सेवा ।*
*दंई मज देवा जन्मोजन्मी ।। १ ।।*
*रूद्रक्षांच्या माळा, भस्म लावू भाळी ।*
*हेचि चंद्रमौळी देई मज ।। २ ।।*
*तीर्थ आणि प्रसाद, मंत्र षडाक्षर ।*
*ध्याउू उमावर जन्मो जन्मी ।। ३ ।।*
*मन्मथ शिवलिंग म्हणे आचरण ।*
*हेचि अष्टावरण वीरशैवा ।। ४ ।।*

वरील अष्टावरणाचे क्रमाने विवेचन पुढील प्रमाणे :

### गुरू

सगळ्याच धर्मात, पंथात अथवा संप्रदायात गुरूंचे महत्व वर्णन केलेले असते. वीरशैव धर्मामधेही श्रीगुरूला अग्रस्थान आहे. श्रीगुरू हा वीरशैवांसाठी प्रत्यक्ष शिवच असतो. निर्गुण, निराकार शिवतत्व दृष्टीस दिसत नाही. तसेच ते बोलूही शकत नसल्यामुळे उपदेशही करू शकत नाही. म्हणून

आपल्या शिष्याला, म्हणजेच भक्ताला उपदेश करण्यासाठी हे निर्गुण, निराकार शिवतत्व गुरू रूपाने साकार, सगुण होत असते. असे वीरशैव मानतात. केवळ उपदेश नव्हे तर भक्ताला भक्ती करता यावी म्हणूनही हा भक्तवत्सल शिव, गुरूच्या रूपाने सगुण, साकार होत असतो. कारण त्याला भक्तीची आणि भक्तांचीही अत्यंत आवड आहे. अर्थात भक्ती करण्यास योग्य असल्यामुळे निर्गुण , निराकार शिव तत्वाहून त्याच्या सगुण, साकार गुरू रूपाला श्रेष्ठत्व प्राप्त होते. या संदर्भात मन्मथ स्वामींनी परमरहस्यात म्हटले आहे की, इश्वर कोपला तर त्याच्या कोपापासून श्रीगुरू भक्ताला वाचवू शकतात. परंतु गुरू कोपला तर इश्वर भक्ताला गुरूच्या कोपापासून वाचवू शकत नाही. अर्थात मन्मथ स्वामींना म्हणावयाचे आहे की, प्रत्यक्ष निर्गुण , निराकार शिव तत्वापेक्षा त्याचेच सगुण, साकार रूप असणारे श्रीगुरू रूपच श्रेष्ठ आहे.

या संदर्भात प. पू. काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी आपल्या 'अष्टवरण विज्ञान' या ग्रंथात म्हणतात, 'स्वाती नक्षत्राच्या पाण्यानेच



मोती तयार होतो. पण त्या पाण्यापेक्षा मोत्याची किंमत अधिक असते. तसेच श्रीगुरू निर्गुण, निराकार इश्वराचेच सगुण रूप असले, तरी इश्वराहून श्रेष्ठच ठरतात. म्हणून इश्वर आणि श्रीगुरू दोघे एकाच वेळी समोर आले तरी श्रीगुरूलाच प्रथम नमस्कार करावा. असे संत कबीरांनीही म्हटले आहे.' जे कोणी निर्गुण, निराकार शिव तत्व आपल्या शिष्याला उपदेशाद्वारे समजावून सांगतात, त्यांना श्रीगुरू म्हणावे. तसेच जंगम वंशात ज्यांचा जन्म झाला आहे, व ज्याला वीरशैव परंपरेनुसार वीरशैवांच्या एखाद्या मठावर पट्टाभिषेक करण्यात आला आहे आणि शिवाचार्य ही उपाधी देण्यात आली आहे, त्यालाही गुरू म्हणतात.

वीरशैवांची गुरूपरंपरा परशिवाच्या पाच मुखातून अवतरलेल्या पंचाचार्यांपासून चालत आलेली आहे. पंचाचार्यांना महाचार्य असेही म्हणतात. हे महाचार्य आणि शिवाचार्यही जीवनभर ब्रह्मचर्य व्रताचे पालन करतात. याच गुरूकडून उपदेश व दिक्षा प्राप्त करावयाची असते. त्यामुळे प्रत्येक घराण्याला कुलगुरू असतो. वीरशैव धर्मात प्रत्येक व्यक्तीला दिक्षा घ्यावीच लागते. स्त्री पुरूष सर्वांना दिक्षेचा

अधिकार आहे. पट्टाधिकारी असणारे गुरूवर्य शिवाचार्य आपल्या गोत्राच्या स्त्री – पुरूषांना दिक्षा देतात. आठव्या वर्षापर्यंत घेतलेली दिक्षा उत्तम असते. सोळाव्या वर्षापर्यंत घेतलेली दिक्षा मध्यम असते. यानंतरच्या वयात घेतलेली दिक्षा फारशी महत्वाची मानली जात नसली तरी ती घेणे गरजेचेच असते. कारण दिक्षित म्हणजे दिक्षा घेतलेल्या भक्तांचीच पूजा शिवाला मान्य असते. दिक्षा न घेतलेल्या भक्ताची पूजा शिवाला मान्य होत नाही. इश्वर दिक्षावंत नसणाऱ्या भक्तांची पूजा स्वीकारीत नाही.

**दिक्षेचे तीन प्रकार :–**

१ – वेधी दिक्षा, २ – मंत्री दिक्षा, ३ – क्रिया दिक्षा.

**या प्रकारानुसार गुरूंचेही तीन प्रकार असतात.**

१ – दिक्षा गुरू, २ – शिक्षा गुरू, ३ – ज्ञान गुरू. बहुधा हे तिन्ही गुरूंचे प्रकार एकाच गुरूमध्ये समाविष्ठ असतात. त्यासाठी तीन वेगवेगळेच गुरू असावेत असे नव्हे. वरील तिन्ही दिक्षा मानवाच्या त्रिमलाचे निरसन करतात.



## लिंग

विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय म्हणजे विनाष यांना कारणीभूत असणाऱ्या परशिवास लिंग असे म्हणतात. कदाचित आपल्यापैकी कांहींनी लिंगाविषयी कांही तरी तथ्यहीन अशा कथा व वर्णन ऐकले असेल. पण ते खरे नाही. लिंगाची वरील व्याख्याच सत्य आहे. लिंग हे शक्तिविशिष्ठ शिवाचे द्योतक वा प्रतीक आहे. आणाखी असे की, जे शिवयोगी असतात ते मुक्त झाल्यावर याच परतत्वात विलीन होतात. म्हणूनही याला लिंग असे म्हटले जाते.

सर्वसाधारणपणे बाण आणि पीठ असे लिंगाचे दोन भाग असतात. बाण हे शिवाचे तर पीठ हे शक्तीचे प्रतीक, म्हणजे चिन्ह असते. या लिंगांचे तीन प्रकार असतात.

**१– इष्टलिंग, २– प्राणलिंग, ३–भावलिंग.**

**इष्टलिंग:–**

हे स्थूल स्वरूपाचे लिंग असते. स्फटिक किंवा इतर शिळेपासून याची निर्मिती होते. सर्व लिंगास बाण, पीठ याबरोबरच गोमुख असे तीन भाग असतात. वरील

गोलाकारास बाण असे म्हणतात. त्याच्या खालच्या भागास पीठ असे म्हणतात आणि जलहरीसच गोमुख म्हणतात. लिंग तयार करताना आधी बाण घडविला म्हणजे, केला जातो व त्या बाणाच्या प्रमाणात पीठाच्या खालच्या व वरच्या भागाचा आकार, म्हणजे रूंदी वगैरे ठेवतात. बाणाच्या वर्तुळाच्या अर्ध्या मापाचे गोमुख असते. एकंदर बाणाचे वर्तुळ, पीठाची लांबी, पीठाच्या खालच्या व वरच्या भागाची रूंदी आणि गोमुख वर्तुळाच्या अर्धे अशा प्रमणात असणाऱ्या लिंगाला पंचसुत्री लिंग असे म्हणतात. पंचसुत्री लिंगच पूजेसाठी योग्य असते. वरीलप्रमाणे लिंगाच्या भागाची मापे प्रमाणबध्द नसतील तर अनेक दोष निर्माण होतात. त्यामुळे अनेक प्रकारची हानी होवू शकते. इष्टलिंग हे अंगुष्ठमात्र, म्हणजे हाताच्या अंगठ्या एवढे असावे असे शास्त्रात सांगितले आहे. हे इष्टलिंग श्रीगुरू क्रियादिक्षेच्या वेळी अभिषिक्त करून व त्यात प्राणप्रतिष्ठा करून शिष्यास देतात. असे दिले गेलेले लिंगच फक्त इष्टलिंग म्हटले जाते. अशा इष्टलिंगाच्या नित्य पूजनानेच लिंगांग सामरस्याची म्हणजे मुक्तीची प्राप्ती होते.



श्रीगुरूकडून प्राप्त झालेल्या या इष्टलिंगास योग्य धातूच्या सज्जिकेत ठेवून ते मस्तक, कंठ, वगैरे ठिकाणी पण फक्त बेंबीच्या वरच, जीवनभर धारण करावयाचे असते. त्याचा वियोग होवू द्यायचा नसतो. असे इष्टलिंग धारण करण्याचा अधिकार स्त्री–पुरूष दोघांनाही आहे.

या इष्टलिंग पूजेसाठी कसलेही सुतक पाळीत नाहीत. इष्टलिंग पूजा हे नित्यकर्म आहे. नित्यकर्म करण्यास सुतकबाधा नसते. मग ते जनन, मरण, रज्जोदर्शन वा कसलेही सुतक असो. सर्व प्रकारच्या सुतकातही स्त्री – पुरूषांनी स्नान करून पवित्र होऊन इष्टलिंग पूजा करावी.

**प्राणलिंगः–**

सर्वसामान्य मानवाला प्राणलिंगाची प्रचिती येणार नाही. कारण ते इष्टलिंग वा इतर लिंगासारखे स्थूल लिंग नाही. योगाभ्यासाने ते कांही अंशी आकलन करून घेता येवू शकते. ह्रदयातल्या अनाहत चक्रात अंगुष्ठमात्र ज्योतीच्या स्वरूपात हे लिंग असते. याच्या पूजनाचा विधीही मानसिकच असतो. म्हणजे, जसे क्षमारूपी जल, निरहंकार कृती याच अक्षता. असा सगळा प्रकार असतो. हे पूजन मानसिक पातळीवरचे

असते. या पूजेने मानवाची बहिर्मुख वृत्तीच संपविली जाते व माणूस अंतरात्म्यात पहायला लागतो. परिणामी त्याच्यात सद्गुण व सद्भावनांचा उदय होतो. असा लाभ व्हावा यासाठीच इष्टलिंगपूजेकडून प्राणलिंगपूजेकडे जाण्याचा प्रयत्न मानवाने करावयाचा असतो.

**भावलिंग :–**

वरील प्राणलिंग पूजनाच्या सरावाने बाह्य क्रियांचा विलय झाल्यानंतर 'मी शिवरूप आहे' अशी स्थीर भावना निर्माण होते. याचा परिणाम म्हणून मस्तकात व बुध्दीत एक ज्योत जाणवत राहते. ही जाणीव म्हणजेच आत्मस्वरूपाचा साक्षात्कार असतो. या ज्योतीचा वा या अवस्थेला 'भावलिंग' म्हणतात. हे निराकार असते. याचा केवळ साक्षात्कार होतो. हा साक्षात्कार म्हणजेच 'शिवोहम्' चा साक्षात्कार असतो. या भावलिंगाची पूजा कुठल्याही वेगळ्या वा बाह्य साधनांनी होत नसते. ती पूजा शिवोहम् भावनेनेच करावी लागते. म्हणून याला भावलिंग म्हणतात. इष्टलिंगाची पूजा करीत करीत प्राणलिंग आणि भावलिंगाप्रत पोहोचण्याचा उद्देश भक्त ठेवीत असतो. इष्टलिंगामुळे स्थूल



शरिराचे, प्राणलिंगामुळे सूक्ष्म शरिराचे व भावलिंगामुळे कारण शरिराचे रक्षण होते. हे तिन्ही लिंग मानवाच्या तिन्ही शरिराचे रक्षण करतात.

## जंगम

जिवनमुक्त महापुरूषास जंगम म्हणतात. असा महापुरूष जनन, मरण, गमन रहीत असतो. हा शिवज्ञान संपन्न असतो. असे असले तरी व्यवहारात जंगम ही एक जाति वाचक संज्ञाही आहे. या जातीतील व्यक्तिलाही जंगम म्हणून वीरशैव आदरणीय मानतात. कदाचित यांच्या वंशात पूर्वी कधी तरी असे जीवनमुक्त व्यक्तिमत्व होऊन गेलेले असावे. पण जंगम जातीत जन्मलेली व्यक्ती नसली तारीही ती व्यक्ती शिवज्ञान संपन्न व म्हणून मुक्त असेल तर वीरशैव त्याही व्यक्तिला तेवढाच आदर देतात. द्यायलाच हवा. जंगमाचेही तीन प्रकार आहेत.

१. स्वयं जंगम, २. चर जंगम आणि ३. पर जंगम.

**स्वयं जंगम :–**

हा सर्वत्र केवळ स्वतःलाच पाहतो. हा अहंकाररहित,

ममतारहित असतो. हा कोठे तरी मठात वा एखाद्या गावात राहतो. याला एकांतवास प्रीय असतो. हा सतत शिव ध्यानात मग्न राहतो याचे सर्वत्र स्वतःला पाहणे म्हणजे दुसरे तिसरे कांही नसून सर्वत्र शिवरूप पाहणे असते.

**चर जंगम :-**

यालाही स्व स्वरूपाचे ज्ञान असते. हा आनंदित होऊन सर्वत्र संचार करीत असतो. याला मान पान काही जाणवत नाही. आपल्या संचारात हा लोकोध्दाराचे कार्य करीत असतो. असे कार्य त्याच्याकडून सहजच होत असते. लोकोध्दारासाठीच तो सर्वांना शिवस्वरूपाचा उपदेश करीत असतो.

वीरशैवांच्या मठावर पूर्वी दोन प्रकारचे जंगम असत. पैकी एक सतत मठातच राहून मठात येणाऱ्या भक्तांना शिव स्वरूपाचा उपदेश करणारा पट्टाधिकारी असे. तर दुसरा चर पट्टाधिकारी म्हणजे चर जंगम असे, जो सतत सर्वत्र फिरून लोकांना शिवस्वरूपाचे ज्ञान उपदेशित असे. परंतु कांही अडचणीमुळे आता हे चर आणि स्थीर अधिकार एकाच व्यक्तिला दिले जातात. त्यामुळे या जंगमास कांही दिवस



मठात राहून तर कांही दिवस भ्रमण करून लोकांना शिवज्ञानाचा उपदेश करावा लागतो.

**पर जंगमः-**

हा जंगम तर अगदीच जिवनमुक्त असतो. याच प्रकारच्या जंगमाला सर्वश्रेष्ठ मानले जाते. जीवनमुक्ताची पराकाष्ठा याच्या ठिकाणी पहावयास मिळते. या स्थितीला तुर्यावस्था वा परमहंस अवस्था असेही म्हटले जाते. हा देहधारी तर असतोच, पण याला देहभान नसल्यामुळे याला विदेही म्हटले जाते. याचे नित्याचे व्यवहारही इतरांनी करावे लागतात. हा स्वतः कांहीही करीत नाही. गुरू आणि लिंग या अवरणावरून जंगम हे अवरण महत्वाचे मानले जाते. इतकेच नव्हे तर जंगमाला शिवाचे साकार रूप मानले जाते. जंगमाला लिंगाचे मुख मानतात. म्हणून लिंगाला जे कांही अर्पण करावयचे ते सगळे जंगमाला अर्पण करतात. असे म्हणतात की, म. बसवेश्वर आपल्या राज्यात दररोज एक लाख शहाण्णव हजार जंगमांना जेवायला घालून त्या सर्वांना वस्त्र व दक्षिणा देत. पुराणातून जंगम भक्तीच्या व जंगमांनी भक्तांची परिक्षा घेतल्याच्या अनेक कथा आलेल्या आहेत. त्या कथातून

कधी शिव प्रगट झाले तर ते जंगम रूपातच प्रगट होतात.

## भस्म

असे म्हटले जाते की, भस्म नसणारे कपाळ आणि शिवालय नसणारे गाव धिःकारण्याच्या योग्यतेचे असतात. इतके भस्माचे महत्व आहे. सर्व वीरशैव आणि शैवही आपल्या दोषांच्या निवारणार्थ भस्म धारण करतात. भस्म धारण विधी सोपाधिक आणि निरूपाधिक असा दोन प्रकारचा असतो. निरूपाधिक भस्म अंतरिक स्वरूपाचे असते. ते भस्म म्हणजे अगदी शिवरूपच होय. उच्च कोटीच्या साधकालाच या भस्माचा लाभ होतो व तोच हे भस्म घारण करू शकतो. शिव चिद्रूपाने प्रकाशमान होतो. म्हणून अशा परशिवालाच भस्म असे म्हणतात. ही जाणीव वा अनुभूती फक्त उच्च कोटीच्या साधकालाच होवू शकते.

दुसरे भस्म सोपाधिक होय. हे भस्म गोमयरक्षा मंत्र संस्काराने परिशुध्द करून तयार केले जाते. हे तयार करण्याच्या चार रीती आहेत. त्यांची नावे क्रमाणे अशी, १. कल्प, २. अनुकल्प, ३. उपकल्प, ४. अकल्प.

हे भस्म पाच प्रकारच्या गाईच्या शेणापासून तयार केले



जाते. त्यामुळे या भस्माचेही पाच प्रकार होतात. ते असे, १. विभूती, २. भसित, ३. भस्म, ४. क्षार, ५. रक्षा. भस्म धारण करण्याच्याही तीन पद्दती आहेम. १. भस्म स्नान, २. भस्मोधूलन, ३. त्रिपूंड धारण. यातील भस्म स्नान हे गंगा नदीच्या स्नानाहूनही पवित्र असते. पण भस्म स्नानापूर्वी प्रत्यक्ष स्नान करावे लागतेच. भस्म स्नानामुळे अनेक ऋषी , मुनींचे कल्याण झाल्याचे उल्लेख अनेक पुराणात आले आहेत. भस्म स्नानानंतर भस्मोधूलनही करावे. भस्मामुळे पापाचा नाष होऊन अनेक भक्तांचा उधार झाल्याच्या कथा पुराणातून सांगितल्या आहेत. पैकी एक अशी, एकदा एक महा पातकी राक्षस भस्म धारण केलेल्या भक्ताला गिळून टाकण्यासाठी सरसावला. परंतु त्याने त्या भक्तास स्पर्श करताच त्याची वृत्ती पालटली व त्या भक्ताला गिळून टाकण्याऐवजी तो त्या भक्ताच्या चरणावर मस्तक ठेऊन म्हणाला, ‘ महाराज, मी तर आपणास खाऊन टाकण्यासाठी सज्ज झालो होतो. पण आपणास स्पर्श करताच मला आपले चरण वंदिण्याची इच्छा कशी काय झाली ?’ त्यावर भक्त म्हणाला, ‘ हा भस्माचाच प्रताप

आहे. भस्म धारणाने माझे शरीर शिवमय झाले आहे. शिवस्पर्श सर्वकांही करू शकतो.' तात्पर्य भस्माच्या स्पर्शाने सगळी पातके नष्ट होतात.

## रूद्राक्ष

रूद्रक्षाच्या वृक्षाची निर्मितीच शिवाच्या डोळ्यातून ओघळलेल्या अश्रूतून झाली आहे. त्रिपुरासुरांनी देवांना त्रास दिला. देवांनी शिवाला त्रिपुरासुरांचा बंदोबस्त करण्याची विनंती केली. त्रिपुरासुरांची तिन्हिही नगरे एकाच रेषेत येईपर्यंत शिव त्याकडे दृष्टी लावून बसले. असे एक टक पाहण्यामुळे त्यांच्या नेत्रातून जे अश्रू ओघळले, त्यापासून हे वृक्ष निर्माण झाले. त्या वृक्षाच्या बियांना रूद्राक्ष म्हणतात. हे रूद्रक्ष अडतीस प्रकारचे असतात. त्यांची मुखे एक ते चौदा असतात. एक मुखाचा रूद्रक्ष दुर्मिळ असतो. कीड न लागलेला व इतरांनी कोणी पूर्वी न धारण केलेला रूद्राक्ष धारण करावयाचा असतो. किती मुखाचे रूद्राक्ष धारण केल्याने काय फलप्राप्ती होते, त्याची वर्णने विविध ग्रंथांतून आलेली आहेत. रूद्राक्षाचे पाणी अंगावरून घेतल्यानेही



लाभ होतो. नित्य रूद्राक्ष धारण केल्याने गोदानाचे पुण्य प्राप्त होते. रूद्राक्ष केवळ वीरशैवच नव्हे तर सगळेच लोक धारण करतात. कारण आरोग्याच्या दृष्टीने रूद्राक्ष धारण करणे लाभदायक असते. रक्तदाबादि विकारावर रूद्राक्ष गुणकारी आहेत.

## मंत्र

ज्याच्या मननाने मनन करणाराचे रक्षण होते त्याला मंत्र म्हणतात. मंत्र सप्त कोटी आहेत असे म्हटले जाते. या सात कोटी मंत्रामध्ये प्रत्यक्ष शिवाचा साक्षात्कार घडविणारा पंचाक्षरी मंत्र सर्वश्रेष्ठ आहे. या पंचाक्षरी मंत्राला ओंकार हा प्रणव जोडल्यावर तो षडाक्षरी मंत्र होतो. हा षडाक्षरी मंत्र शिव जीवाचे ऐक्य दर्शवितो. म्हणून या मंत्राला महामंत्र असे म्हणतात.

हा मंत्र श्रीगुरूकडून उपदेशात घ्यायला हवा. वीरशैवांचे शिवाचार्य आपल्या गोत्रातील अनुयायांना मंत्रदिक्षा देताना या मंत्राचा शिष्याला उपदेश करतात. श्रीगुरूंच्या उपदेशाशिवाय केवळ पुस्तकात वाचून जर कोणी याचा जप केला, तर त्याचा उध्दार होत नाहीच. पण त्याला दोषही

लागतो. पूर्व अथवा उत्तर दिशेकडे मुख करून बसून आपल्या इष्टलिंगाच्या साक्षीने स्फटिक, मोती, रूद्राक्ष वगैरेपैकी एखाद्या माळेच्या सहाय्याने कमीत कमी १०८ किंवा त्याच्या पटीत जप करावा. जप करण्यासाठी आपल्या हाताची कोणती बोटे वापरतो, त्याप्रमाणे वेग वेगळी फलप्रप्ती होऊ शकते. श्रीगुरूने उपदेशिलेल्या मंत्राचा अत्यंत शुध्द जप करावा. उच्चार अशुध्द असतील तर नऊ प्रकारचे दोष निर्माण होऊ शकतात. मंत्रजप वाचिक, उपांशू अथवा मानसिक असा तीन प्रकारचा असू शकतो. इतरांना ऐकायला येईल अशा प्रकारे मंत्रोच्चार केल्यास तो जप वाचिक होतो. केवळ ओठांची हालचाल करून केलेला, पण शब्दोच्चार इतरांना ऐकायला न येणारा जप उपांशू असतो. जप मनातल्या मनात केल्यास तो जप मानसिक असतो. हा मानसिक जपच श्रेष्ठ होय.

पुरश्चरणः– श्रीगुरूंने दिलेल्या मंत्राचे पुरश्चरण करावे. प्रत्येक अक्षरास एक लाख, आणि पुन्हा त्याच्या चौपट जप करणे म्हणजे पुरश्चरण होय. पंचाक्षर मंत्रात पाच अक्षरे आहेत. म्हणजे २० लाख जप. याला पुरश्चरण म्हणतात.



मंत्र जपाचे विधान पुष्कळ असले तरी व सिध्द आणि साध्य असे जपाचे भेद असले तरी श्रध्देच्या बळाने जप सफल होतो. कलियुगात पंचाक्षर मंत्राच्या जपाशिवाय दुसरा सोपा उपाय नाही. म्हणून श्रीगुरूकडून पंचाक्षर मंत्र गृहण करावा. मंत्र जपात श्रध्देची अत्यंत अवश्यकता असते.

## तीर्थ

'तीर्थ' म्हणजेच पादोदक होय. तसेच शिवाच्या परमानंद स्वरूपाला 'पाद' म्हणतात आणि त्या आनंदाच्या ज्ञानाला, 'उदक' म्हणतात. म्हणजे थोडक्यात स्व स्वरूपाच्या ज्ञानाचा आनंद म्हणजेच पादोदक होय.

वीरशैवांच्या पूजेच्या परंपरेनुसार गुरू, लिंग अथवा जंगमाच्या पाद्य पूजेने प्राप्त पवित्र चरणामृतासही पादोदक म्हणतात. कारण भक्तिभावाने त्याचे सेवन केल्याने मनाची मलीनता दूर होऊन 'स्व' स्वरूपाच्या ज्ञानाची योग्यता प्राप्त होते. पादोदक विशिष्ठ पद्दतीने करावे लागते. गुरूचरणाच्या वेगवेगळ्या भागात शिवाच्या वेगवेगळ्या नावाचे व रूपाचे अस्तित्व कल्पून अंगठ्यापासून करंगळी पर्यंत पायावर पाणी

ओतायचे व अंगठ्याखाली एका पात्रात त्या पाण्याचा संचय करायचा. हे करण्यापूर्वी श्रीगुरूंची तीर्थासाठी अनुमती घ्यायची असते. पाद्यपूजेने प्राप्त झालेल्या या चरणामृतासही पादोदक म्हणतात. हे पादोदक प्रथम श्रीगुरूच प्राशन करतात. त्यांच्यानंतर पूजा करणारा भक्त व नंतर इतर लोकांनी पादोदक प्राशन करावे. मन्मथ स्वामींनी परमरहस्यात म्हटले आहे की, पादोदकासाठी श्रीगुरूचे शरीर निरोगी व योग्य असले पाहिजे. एखादा अवयव गेला असेल वा शरीर रोगग्रस्त असेल तर त्याचे पादोदक वर्ज समजावे. गुरूच्या पादोदकास गुरूपादोदक म्हणतात. तसेच लिंगाच्या पादोदकास लिंगपादोदक म्हणतात. तर जंगमाच्या पादोदकाला जंगम पादोदक म्हणतात. यांनाच अनुक्रमे दिक्षा पादोदक, क्रिया पादोदक व शिक्षा पादोदक असेही म्हटले जाते. हे पादोदक सर्व तीर्थापेक्षा पवित्र मानले जाते. वीरशैव भक्त दररोज या तिन्ही पादोदकाचा स्वीकार करीत असतात. जर गुरू अथवा जंगम उपलब्ध नसेल तर लिंग पादोदकच त्या दोघांचेही पादोदक आहे असे गृहीत धरून त्याचेच प्राशन करतात. या क्रीयेला संमंधाचार असे म्हणतात.



## प्रसाद

मन सदैव प्रसन्न राहणे म्हणजेच प्रसाद होय. जे अन्न आपण सेवन करतो त्याच्या परिणामातून मन तयार होत असते. सगळ्या वस्तू भोग्य व धार्य या दोन प्रकारात मोडतात. अन्न व पाणी हे भोग्य आहे. तर वस्त्र अलंकार हे धार्य आहेत. वीरशैवात या भोग्य व धार्य वस्तू प्रथम गुरू, लिंग अथवा जंगमाला अर्पण केल्या जातात व त्याचा शेष प्रसाद म्हणून त्या स्वीकारल्या जातात. त्यामुळे मनास प्रसंन्नता प्राप्त होते. थोडक्यात शिवार्पित वस्तूना प्रसाद म्हणतात.

गुरूच्या प्रसादाला शुध्द प्रसाद, इष्टलिंगाच्या नैवेद्याला सिध्द प्रसाद तर जंगमाच्या प्रसादाला प्रसिध्द प्रसाद म्हणतात. प्रसाद सेवनाने मनाचे दुर्व्यवहारापासून रक्षण होते. म्हणून प्रसाद हेही वीरशैवांचे रक्षा कवचच आहे.

❖❖❖

## पंचाचार

अष्ठवरणाच्या बरोबरीने वीरशैवांसाठी पाच प्रकारचे आचरण वीरशैवांच्या धर्मग्रंथात सांगितले आहे. म्हणजे वीरशैवांचे आचरण या पाच प्रकारचे असावे अशी अपेक्षा असते. कारण अशा आचरणाचे त्यांच्या भक्तीस सहाय्य होत असते. हे पाच आचार असे.

१. लिंगाचार, २. सदाचार, ३. शिवाचार, ४. गणाचार, ५, भ्रत्याचार.

**लिंगाचार**

वीरशैव सिध्दांत जीव आणि शिव यांच्यासाठी अनुक्रमे अंग आणि लिंग हे परिभाषिक शब्द वापरीत असतो.



जिवाला शिवरूप व्हायचे असते. तेच त्याचे अंतिम उद्दिष्ठ असते. ते साध्य करण्यासाठी त्याला इष्टलिंग स्वरूपात शिवाची आराधना करावी लागते. हे इष्टलिंग त्याला त्याच्या कुलगुरूने दिक्षापूर्वक दिलेले असते. हे इष्टलिंग स्थूल असते. परंतु ते त्या निर्गुण, निराकार, सर्वव्यापी शिवाचे प्रतीक असते. दिक्षेच्या वेळी श्रीगुरू या इष्टलिंगात अंग आणि लिंग म्हणजे जीव आणि शिव यांच्या जिवनकळेची स्थापना करतात व जीवनभर त्या इष्टलिंगाला शरिरावर धारण करण्यास सांगतात. त्याच्या अराधनेचे जे आचरण असते, त्यातूनच लिंगांग सामरस्य साध्य करावयाचे असते. ते साध्य करण्यासाठी जे आचरण करावे लागते, त्यालाच लिंगाचार म्हणतात. थोडक्यात म्हणजे, भक्ताने आपल्या कायेने इष्टलिंग पूजन, मनाने शिव चिंतन, आणि भावनेने सतत शिवघ्यास घेत राहणे याला शिवाचार म्हणतात. असे श्री १००८ जगद्गुरू, काशी ज्ञानसिंहासनाधीश, डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी आपल्या प्रबंधात म्हटले आहे. इष्टलिंगाची उपासना करीत करीत प्राणलिंग आणि भावलिंगाची उपासना साध्य करावयाची असते. या तिन्ही

लिंगाच्या अराधनेत लिप्त राहणे हाच लिंगाचार असतो.

**सदाचार**

सदाचार याचा व्यावहारिक म्हणजे वाच्य अर्थच चांगली वर्तणूक असा आहे. परंतु चांगली वर्तणूक कुणाच्या दृष्टिकोनातून ? असा प्रश्न निर्माण होणारच. या संदर्भात ही चांगली वर्तणूक वीरशैव तत्वाला अनुसरून आहे. वीरशैव भक्ताने दिक्षेनंतर जे वर्तणुकीचे नियम असतात ते पाळायचे असतात. ते पाळणे म्हणजेच सदाचार होय. या नियमात नित्य इष्टलिंगोपासना येते. तसेच इष्टलिंगाच्या प्रसादाशिवाय कांहीही न खाणे वगैरे नियम येतात. सदाचाराची एकंदर आठ शीले चंद्रज्ञानागमात सांगितली आहेत. त्यांची नावे अशी. - अंकुरशील, उत्पन्नशील, द्विदलशील प्रवृध्दशील, सप्रकांडशील, सशाखशील, सपुष्पशील आणि सफलशील. ही आठ शीले म्हणजे सदाचाराचे आठ उपप्रकार मानावे लागतात. तथापि वीरशैव तत्वानुसार आचरण करणे असाच सदाचाराचा अभिप्राय आहे. सदाचार शिवाला आवडतो. सदाचाराशिवाय भक्ताला लिंगांग सामरस्याकडली वाटचाल करता येणार नाही.



**शिवाचार**

प. पू. काशी महास्वामी श्री१००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य यांच्या प्रबंधाचे जे मराठी भाषांतर लिं. शे. दे. पसारकरांनी केलेले आहे, त्यात म्हटले आहे, ‘ शृष्टी, स्थिती, संहार, निग्रह, व अनुग्रह या पाच कृत्याचा कर्ता शिव आहे. तोच माझा अनन्य रक्षक आहे. या भावनेने वर्तन करणे यालाच शिवाचार म्हणतात. ’यामध्ये भक्त शिवाला शरण जात असतो. त्यामुळे तो शिवाचे वैश्विक रूप जाणायला लागतो. सगळेच जीव शिवांश असल्यामुळे कुणाही जिवाचा द्वेश करू नये ही वृत्ती त्या भक्ताच्या अंगी बाणते. त्याचा भाव शुध्द होतो. त्यामुळे त्याचे आचरण शुध्द होत जाते. या आचरण शुध्दीसाठी उपभोग्य वस्तूंची शुध्दी करून तिचा उपभोग घ्यावा लागतो. हे शुध्दिकरण गुरू पादोदकाने वा भस्माच्या सहाय्याने करता येते. इतकेच काय पण अगदी भक्ताच्या स्पर्शानेसुध्दा शुध्दिकरण घडून येऊ शकते. शैवागमानुसार सोळा प्रकारच्या बाबींची शुध्दी कशी होते याचे वर्णन महास्वामींच्या प्रबंधात आले आहे. त्या सोळा बाबी अशा- द्रव्यशुध्दी, क्षेत्रशुध्दी, गृहशुदी,

भांडशुध्दी, तृणशुध्दी, काष्टशुध्दी, वाटिका शुध्दी. पाकशुध्दी, रसशुध्दी, भवशुध्दी, भूतशुध्दी, भावशुध्दी, मार्गशुध्दी, कालशुध्दी, वाक्शुध्दी, आणि जलशुध्दी. त्या काळात या सोळा बाबी शुध्द करून घेणे गरजेचे वाटले. आज याशिवाय अनेक नवीन बार्बीची शुध्दी करून घेणे गरजेचे असू शकते. आणि आपण तशी अनेक बाबींची शुध्दी करीतही असतो. उदाहरणार्थ नवी गाडी घेमली, वा नवा कॉम्प्युटर जरी घेतला तरी आपण त्यास भस्म, हळदी, कुंकू, लाऊन शिवार्पण करून वापरतो. ही त्या वस्तूंची शुध्दीच असते. एकंदरीत काय तर सगळे कांही शिवस्वरूप पाहणे व शिवार्पण करून प्रसाद रूपाने उपभोगणे यालाच शिवाचार म्हणतात.

**गणाचार**

गण म्हणजे शिवगण. शिवगण शिवासमान असंतात. ते शिवाचे सहचारी असतात व शिवाचे अनन्य भक्त असतात. अशा या शिवगणांचे जे आचरण, तोच गणाचार असायला हवा. आगमोक्ती प्रमाणे शिवभक्ताने जे आचरण करावयाचे त्याला गणाचार म्हणतात असे काशी महास्वामींच्या उपरोक्त



प्रबंधात म्हटले आहे व याचे स्पष्टिकरण करताना म्हटले आहे, ‘ इष्टदेवता, श्रीगुरू आणि धर्मग्रंथाच्याविषयी कुणी अधार्मिकांकडून निंदा घडली तर सामोपचाराने अथवा दंडोपचाराने त्याचा विरोध करून अधार्मिकाला धार्मिक करणे याला गणाचार म्हणतात. शिवनिंदा शिव भक्ताने ऐकू नये. निंदा करणारा जितका दोषी असतो तितकाच निंदा ऐकणारा व सहन करणाराही दोषी असतो. म्हणून शिवनिंदकाला समजाऊन सांगणे. नच ऐकले तर सामर्थ्य असल्यास त्याला दंड करणे. सामर्थ्य नसेल तर तेथून निघून जाणे. यालाच गणाचार म्हणतात. ’या गणाचाराच्या आचरणीय अशा चौंसष्ट कलाही महास्वामींच्या प्रबंधात सांगितल्या आहेत परंतु थोडक्यात शिवनिंदा, गुरूनिंदा, धर्मग्रंथ वा धर्मनिंदा ऐकूण न घेणे. त्याला विरोध करणे यालाच गणाचार म्हणतात.

**भृत्याचार**

भृत्य या संस्कृत शब्दाचा अर्थ सेवक असा आहे. म्हणून भृत्याचार म्हणजे सेवक वृत्तीने आचरण करणे होय. वीरशैवात ‘ दोसोहं ’ हे तत्व प्रचलित आहे. याचा अर्थ मी

शिवाचा व शिवभक्ताचा दास आहे असा आहे. हे जग शिवमय आहे. म्हणून जगातल्या प्रत्येकाचा दास होऊन शिवभक्ताने सेवा करायला हवी. विशेषतः गुरू, लिंग आणि जंगम म्हणजे शिवयोगी हे शिवाचेच रूप होत. या सर्वांची सेवा अत्यंत नम्रपणे भक्ताने करायची असते. भृत्याचाराचा एक फायदा असा असतो की, माणूस अत्यंत नम्र होतो. शिवभक्ताहून श्रेष्ठ या जगात कोणी नाही ही भावना त्याच्या मनात निर्माण होते. त्यामुळे तो सर्वांशी मोठ्या आदराने व सेवक वृत्तीने वागतो. तसेच सर्व शिवभक्तांची सेवा करण्यास तत्पर असतो. भ्रत्याचाराचेही दोन प्रकार शैवागमात सांगितले आहेत. १.भृत्यभाव,२. वीरभृत्यभाव, याचे स्पष्टिकरण असे, गुरू, लिंग, जंगमाची किंकर भावाने सेवा करणे हा भृत्यभाव होय. तर गुरूला तन, इष्टलिंगाला मन, व जंगमाला धन अर्पण करणे आणि केवळ लिंगांग सामरस्याची अपेक्षा बाळगणे हा वीरभृत्यभाव होय.

अशा प्रकारे पंचाचार अष्टवरणाप्रमाणेच अध्यात्म मार्गात वीरशैवांसाठी आवश्यक आहेत. हे पाचही आचार मानवाला खऱ्या अर्थाने भक्त म्हणून सिध्द करीत असतात.



अष्टवरणांने जसे मुक्तिच्या वाटचालीत भक्ताचे संरक्षण होते तसेच या पंचाचारामुळेही भक्ताचे षड्रिपूपासून रक्षण होते. पंचाचार अनुसरणाऱ्या वीरशैवांच्या वाटेला षड्रिपू येत नाहीत. कारण त्यांचा भाव सेवकांचा झाल्यामुळे तो नम्र होतो. नम्र झाल्यामुळे गर्व, मद हे त्यांच्यापासून दूरच राहतात. मद गेला की, मोह जातो. मोहापाठोपाठ क्रोध जातो. एकंदर सर्व दोषपासून भक्तांचे रक्षण होते. त्यामुळे पुढचा त्यांचा लिंगांग- सामरस्याचा प्रवास सुकर होतो. म्हणून पंचाचार महत्वाचे आहेत.

❖❖❖

## षट्स्थळ

षट्स्थळ हाच वीरशैव तत्वज्ञानाचा म्हणजेच वीरशैव दर्शनाचा गाभा आहे. षट् म्हणजे सहा आणि स्थळ म्हणजे अवस्था. भक्त लिंगांगसामरस्याकडे जात असताना त्याच्यात जे बदल होत जातात ते सहा प्रकारचे असतात असे वीशैव तत्वज्ञान मानते. वास्तविक स्थळ शब्दाचा वीरशैव पारिभाषिक अर्थ केवळ अवस्था असा नाही. तर स्थल या शब्दाचा अर्थच शिवतत्व असा अहे. पण असा अर्थ समजून घेणे व समजाऊन सांगणे सोपे असत नाही. म्हणून व्यावहारिक अर्थ, जो स्थिती, अवस्था असा आहे



तोच गृहीत धरूनही सुसंगत विवेचन करता येते. तरीपण आपण लक्षात ठेवले पाहिजे की, स्थल शब्दाचा अर्थ शिव अथवा लिंग असाही असू शकतो. कशी महास्वामींनी त्यांच्या उपरोक्त प्रबंधात स्थल शब्दाची व्याख्या करताना म्हटले आहे, 'चराचर विश्व ज्याच्या ठायी स्थिर असून प्रयलकाली ज्याच्यात लय पावते असे विश्वाच्या उत्पत्ती, स्थिती, लयाला कारणीभूत असलेले तत्व म्हणजे स्थल होय.' असे तत्व स्वतः शिवच आहे. म्हणून स्थल याचा एक अर्थ शिव असाही आहे. परंतु मानवाच्या मोक्षाकडल्या वाटचालीची अवस्था असा सोपा अर्थही षट्स्थल आकलनासाठी उपयुक्त असू शकतो. शिव म्हणजे स्थल. भक्तीच्या गोडी साठी आपल्यात सतत म्हणजे अविनाभाव असणाऱ्या चित्शक्तिच्या योगाने दोन भागात विभाजित होते. या दोन भगालाच लिंगस्थल आणि अंगस्थल अशी दोन नावे वीरशैव तत्वज्ञानाच्या परिभाषेत आहेत. जेंव्हा एका स्थलाचे म्हणजेच शिवतत्वाचे उपासनेसाठी दोन भाग होतात तेंव्हा त्यात अविनाभाव (नित्य) असणारी चित्शक्तिही द्विभाजित होते. तिच्या या दोन भागाला कला आणि भक्ती

अशी दोन नावे आहेत. यापैकी कलाशक्ती शिवाच्या लिंग भागामध्ये वास्तव्यास जाते. तर भक्ती अंग भागात वास्तव्यास जाते. पैकी कला, जी लिंगात सामावलेली असते. तिचे पुढे सहा भागात विभाजन होते व तिचे सहा प्रकार संभवतात. ते असे. १. निवृत्तीकला, २. प्रतिष्ठाकला ३. विद्याकला, ४. शांतिकला, ५. शांत्यातीताकला, ६. शांत्यातीतोत्तरकला कलेप्रमाणे अंग स्थलात असणारी भक्तीही सहा भागात विभागली जाते. ते सहा विभाग असे.

१, श्रदाभक्ती, २, निष्ठाभक्ती, ३, अवधानभक्ती, ४, अनुभवभक्ती , ५, आनंदभक्ती, ६, समरस भक्ती

कलेचे सहा भाग झाल्यामुळे आपोआपच लिंगस्थला-चेही सहा भाग होतात. कारण ही कला आता लिंगरूप झालेली आहे. म्हणून तिच्याबरोबर लिंगाला विभाजित व्हावे लागते. विभाजित झालेल्या त्या लिंगांची नावे अशी. १, आचारलिंग, २, गुरूलिंग, ३, शिवलिंग, ४, जंगमलिंग, ५, प्रसादलिंग आणि ६, महालिंग.

कलेप्रमाणेच भक्तीही सहा स्थलात विभाजित झाल्यामुळे अंगस्थलालाही सहा विभागात विभाजित व्हावे



लागते. त्या सहा विभागाची नावे अशी. १, भक्त, २, माहेश्वर, ३, प्रसादी, ४, प्राणलिंगी, ५, शरण, आणि ६, ऐक्य.

एकंदर असा हा सहा पायऱ्यांचा सोपान समजून घ्यायला थोडा किचकट वाटत असला तरी थोड्या प्रयत्नाने नीट समजतो. आता लिंगस्थलापासून विभक्त झालेल्या अंगस्थलाला म्हणजेच भक्ताला पुन्हा लिंगस्थलाशी एकरूप व्हावयाचे असते. त्यासाठी म्हणजे अंगाला लिंगाशी समरस होण्यासाठीच हा षट्स्थलाचा सोपान चढून जायचे असते. हा सोपान चढताना पंचाचार त्याचे षड्रिपूपासून रक्षण करतात. तर अष्टा वरणच्या सहाय्याने त्याचे हे सोपान पार करणे सुकर होत असते. पारमेश्वर आगमाचा संदर्भ देऊन काशी महास्वामींच्या उपरोक्त प्रबंधात म्हटले आहे,‘ पारमेश्वरागमा मध्ये भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण आणि ऐक्य या स्थलांचे स्वरूप वर्णिले असून भक्त क्रमशः पुढील स्थलात प्रवेश करून मनोविकास करीत ऐक्यस्थलामध्ये लिंगांग सामरस्य प्राप्त करून घेतो. यात मनोविकास हा शब्द म्हत्वाचा

वाटतो. मन, आत्मा हे शब्द मानवाचाच निर्देश करणारे आहेत. आत्मा, मन हेच मानवाचे सर्वस्व अथवा केंद्र असते. म्हणून या षट्स्थल सोपानाच्या प्रवासात जे मानवी वर्तनात बदल होतात ते शारीरिक नसून मानसिक बदलच होत. आता अंग आणि लिंग स्थल षड्विध झाले आहेत. पण इतक्याने त्यांचे प्रकार होणे थांबत नाही. लिंगस्थलाच्या सहा भागाचे पुन्हा तीन तीन भाग होतात. त्यांची नावे अशी.

**आचारलिंगः–**

सदाचारलिंग, नियताचारलिंग आणि गणाचारलिंग.

**गुरूलिंगः–**

दिक्षागुरूलिंग, शिक्षागुरूलिंग, अनुभावगुरूलिंग.

**शिवलिंगः–**

इष्टलिंग, प्राणलिंग, भवलिंग ,

**जंगमलिंगः–**

स्वयंजंगमलिंग, चरजंगमलिंग, परजंगमलिंग.

**प्रसादलिंगः–**

शुध्दप्रसादलिंग, सिध्दप्रसादलिंग, प्रसिध्दप्रसादलिंग,



**महालिंगः–**

पिंडजमहालिंग, अंडजमहालिंग, बिद्वाकाशमहालिंग.

अशा प्रकारे सहा लिंग स्थळाचे प्रत्येकी तीन तीन असे एकंदर अठरा लिंगस्थल प्रकार झाले. परिणामी या लिंगस्थलाची भक्ती करण्यासाठी मग अंगस्थलही आपल्या सहाही प्रकारात प्रत्येक प्रकाराकडून वरील लिंगस्थलाच्या सहाही भागांची सहाच प्रकारे भक्ती करते. या सहा प्रकारच्या भक्तिमुळे जे प्रकार होतात, ते पुढील प्रमाणे.

१ – भक्तस्थलीय भक्त आचारलिंगाची पूजा सहा प्रकारे करतो ते सहा प्रकार असे, आचारलिंग मोही, आचारलिंग भक्त, आचारलिंग पूजक, आचारलिंग वीर, आचारलिंग प्रसादी, आचारलिंग प्राणी,

२ – माहेश्वरस्थलीय भक्त गुरूलगाची उपासना सहा प्रकारे करतो. म्हणून त्याचे सहा प्रकार होतात ते असे. गंरूलिंग मोही, गुरूलिंग भक्त, गुरूलिंग पूजक, गुरूलिंग वीर, गुरूलिंग प्रसादी, आणि गुरूलिंग प्राणी.

३ – प्रसादलिंगस्थलीय भक्त शिवलिंगाची उपासना सहा प्रकारे करतो. म्हणून त्याचेही सहा प्रकार होतात.

ते असे. . शिवलिंग मोही, शिवलिंग भक्त, शिवलिंग पूजक, शिवलिंग वीर, शिवलिंग प्रसादी, आणि शिवलिंग प्राणी.

४ – प्राणलिंगस्थलीय भक्त जंगमलिंगाची उपासना सहा प्रकारे करतो. ते सहा प्रकार असे. जंगमलिंग मोही, जंगमलिंग भक्त, जंगमलिंग पूजक, जंगमलिंग वीर, जंगमलिंग प्रसादी, आणि जंगमलिंग प्राणी.

५ – शरणस्थलीय भक्त प्रसादलिंगाची उपासना ज्या सहा प्रकारे करतो त्याची नावे अशी. प्रसादलिंग मोही, प्रसादलिंग भक्त, प्रसादलिंग पूजक, प्रसादलिंग वीर, प्रसादलिंग प्रसादी, आणि प्रसादलिंग प्राणी.

६ – ऐक्यस्थलीय भक्त महालिंगाची पूजा ज्या सहाप्रकारे करतो त्या सहा प्रकाराची नावे अशी. महालिंग मोही, महालिंग भक्त, महालिंग पूजक, महालिंग वीर, महालिंग प्रसादी, आणि महालिंग प्राणी. अशा प्रकारे सूक्ष्मागमात लिंगस्थलचे एकंदर अठरा प्रकार व अंगस्थलचे छतीस भेद वा प्रकार सांगितले आहेत. म्हणजे षट्स्थळाचे एकंदर ५४ प्रकार झाले.



मात्र ७ व्या किंवा ८ व्या शतकात होऊन गेलेल्या श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी २८ शैवागमातील वीरशैव तत्वज्ञान ‘ सिध्दांत शिखामणी ’ नामक ग्रंथात मांडले आहे. त्यांनी आपल्या या ग्रंथात या स्थलांचा आणखी विस्तार केला व ५४ स्थलाऐवजी १०१ स्थलात अत्यंत सूक्ष्म व तरल असे विवेचन करून हा षट्स्थल सिध्दांत अंगस्थलाची ४४ उपस्थले व लिंगस्थलाची ५७ उपस्थले करून मांडला. ती १०१ उपस्थले पुढील, प्रमाणे.

**अंगस्थलांर्गत भक्तस्थल :–**

आपली उपास्य देवता शिवावर अनन्य निष्ठा ठेवणारा मानव भक्त म्हटला जातो. हा भक्त परिपूर्ण भक्त होण्यासाठी त्याच्यात या अवस्थेत १५ प्रकारचे सूक्ष्म बदल घडत राहतात. म्हणजे या भक्त स्थलाची १५ उपस्थले होतात. त्यांची नावे अशी. पिंडस्थल, पिंडज्ञानस्थल, संसारहेय स्थल, गुरूकारूण्यस्थल, लिंगधारणस्थल, रूद्राक्ष–धारणस्थल, पंचाक्षरीजपस्थल, भक्तमार्गक्रियास्थल, उभयस्थल, त्रिविधसंपत्ती स्थल, सोपाधिकदानस्थल, निरूपाधिकदानस्थल, सहजदानस्थल.

**अंगस्थलांतरगत माहेश्वरस्थलः-**

वरील भक्तस्थलाच्या १५ उपस्थलातून मानसिक पातळीवर बदलत आलेला भक्त वैराग्यप्राप्तीमुळे, ब्रह्म देवादी देवांच्या ऐश्वर्याची लालसा न ठेवणारा निरपेक्ष असा श्रेष्ठ शिवभक्तच माहेश्वरस्थलात प्रविष्ठ झालेला असतो. माहेश्वर स्थलात प्रविष्ठ झालेल्या या भक्ताची अवस्था श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी ९ उपस्थलातून वर्णन केली आहे. ती ९ उपस्थले अशी. माहेश्वरप्रशंसास्थल, लिंगनिष्ठा-स्थल, पूर्वाश्रयनिरसनस्थल, सर्वाद्वैतनिरसनस्थल, अव्हान-निरसनस्थल, अष्टमूर्तीनिरसनस्थल, सर्वसंगनिरसनस्थल, शिवजगन्मयस्थल, आणि भक्तदेहिकलिंगस्थल. अशा एकंदर नऊ उप स्थलातून माहेश्वर स्थलीय भक्त पुढच्या अंगस्थलांतर्गत प्रसादी स्थलात पोहोंचतो.

**अंगस्थलांतर्गत प्रसादी स्थल : –**

माहेश्वर स्थलांच्या उपस्थलांना पार करून आलेला भक्त प्रसादीस्थलाच्या ७ उपस्थलातून परिणत होत जातो. ती प्रसादिस्थलाची सात उपस्थले अशी. प्रसादमहात्म्यस्थल, प्रसादीस्थल, गुरूमहात्म्यस्थल, लिंगमहात्म्यस्थल,



लिंगप्रशंसास्थल, जंगममहात्म्यस्थल, जंगमगौरवस्थल, भक्तमहात्म्यस्थल, शरणमहात्म्यस्थल, शरणकीर्तनस्थल, आणि शिवप्रसादमहात्म्यस्थल.

**अंगस्थलांतर्गत प्राणलिंगी स्थल : –**

स्थूल असणाऱ्या इष्टलिंगाच्या उपासनेने जो चिद्रूप प्राणलिंगाच्या उपासने पर्यंत उन्नत होत जातो, तोच भक्त प्राणलिंगी स्थलात प्रविष्ठ होऊ शकतो. या प्राणलिंगी स्थलाची श्रीशिवयोगी शिवचार्यांनी सिध्दांत शिखामणीमध्ये ५ उपस्थले सांगितली आहेत. ती अशी.

प्राणलिंगस्थल, प्रणलिंगार्चनस्थल, शिवयोग समाधीस्थल, लिंगनिजस्थल, आणि अंगलिंगस्थल. यात शिवयोगी समाधीस्थल असे जे उपस्थल आहे, त्याचा पुढील टीकाकारांनी नाथपंथीय समाधीशी सांधा जोडण्याचा प्रयत्न केल्यामुळे कांही गैरसमज व संजीवन समाधीसम संकल्पना वीरशैवात घुसू शकल्या आहेत. संस्कृत विद्वानांची विवरणाची विश्लेषक पद्दती असल्यामुळे तिचा अतिरेक झाला तर असा प्रकार होऊ शकतो. सूक्ष्मागमातील षट्स्थलाचे जे उपप्रकार आले आहेत त्यात असे समाधीचे

उल्लेख आलेले नाहीत. एकंदर या पाच उप प्रकारातून जाऊन भक्त प्राणलिंगी होतो असे श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी म्हटले आहे.

**अंगस्थंतर्गत शरण स्थल : –**

या स्थलात अंगस्थल आणि लिंगस्थल यांचा संबंध अत्यंत घनिष्ठ झालेला असतो. अगदी सती पती संबंधाचीच उपमा या सबंधाला श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी दिली आहे. अनन्यनिष्ठा हेच या स्थलाचे वैशिष्ठ्य आहे. या स्थलाची श्रीशिवयोगी शिवचार्यांनी ४ उपस्थले सांगितली आहेत. त्यांची नावे अशी. शरणस्थल, तामसनिरसनस्थल, निर्देशस्थल, आणि शीलसंपादनस्थल. या स्थलात भक्त आपला तमोगुण संपूर्ण त्यागतो व श्रीगुरूंच्या उपदेशामुळे त्याला शिवतत्व आत्मसात करण्याची उत्कट इच्छा होते.

**अंग स्थलांतर्गत ऐक्यस्थलः–**

शिवरूप होणारा भक्त ऐक्यस्थलीय म्हटला जातो. सिध्दांतशिखामणीमध्ये या स्थलाची चार उपस्थले सांगितली आहेत. ती अशी. ऐक्यस्थल, आचारसंपत्तीस्थल, एक भाजनस्थल, आणि सहभोजन स्थल. या स्थलाचे वैशिष्ठ्य



असे की, येथे पोहोंचलेला भक्त आपण, श्रीगुरू, इश्वर आणि जगत् यात भेद मानीत नाही. ही अवस्था केवळ विचाराने समजून घेणे किवा या स्थितीची केवळ कल्पना करणे आणि अशी अनुभूती येणे यात महदंतर आहे. ही जाणीव परिपूर्ण अद्वैताची असेल. या अंगस्थलाच्या ४४ उपस्थलांच्या विवरणात समारोपा दाखल काशी महास्वामींनी आपल्या उपरोक्त प्रबंधात म्हटले आहे, ' पिंडस्थलापासून सहभोजनस्थलापर्यंत साधक श्रध्दा, निष्ठा, अवधान, अनुभव, आनंद, व समरस या भक्तीच्या आधारे भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण, व ऐक्य या षट्स्थलातून विकसित होऊन लिंगांग सामरस्य स्थिती प्राप्त करून घेतो.

## लिंगस्थलांतर्गत षट्स्थल विवरण

वीरशैव सिध्दांतानुसार ऐक्यस्थलात पोहोंचलेला भक्त म्हणजे मुक्त जीव होय. पण मुक्त झाला तरी जोवर तो शरीरधारी आहे तोवर त्याने वीरशैवाचार सोडायचा नसतो. वा मुक्ती प्राप्त झाली म्हणून कुठल्याही प्रकाराने शरीर त्याग करायचा नसतो. शरीर नैसर्गिकरित्याच सुटले पाहिजे.

तोपर्यंत अशा मुक्त असणार्या जीवालाही म्हणजे शिवयोग्यालाही इष्टलिंग उपासनादी वीरशैवाचार निष्ठापूर्वक इतरांना मार्गदर्शन व्हावे म्हणून आचरावे लागतात. म्हणूनच वीरशैवांना संजीवन समाधी वर्ज्य असते. ही बाब वीरशैवांच्या मनावर ठसवावी लागेल. म्हणजे शिवयोगी मन्मथ स्वामींनी संजीवन समाधी घेतली नाही हे त्यांना आकलन होईल.

सिध्दांतशिखामणीत पुढे श्रीशिवयोगी शिवाचार्य लिंगस्थलांतर्गत जी ५७ उपस्थले आहेत त्यांचे विवरण करीत आहेत.

**लिंगस्थलांतर्गत भक्तस्थल**

यात ९ उपस्थले सांगितली आहेत. ती अशी. दिक्षागुरूस्थल, शिक्षागुरूस्थल ज्ञानगुरूस्थल, क्रियालिंग-स्थल भावलिंगस्थल, ज्ञानलिंगस्थल, स्वयंस्थल, चरस्थल आणि परस्थल.

**लिंगस्थलांतर्गत माहेश्वरस्थल**

माहेश्वरस्थलाचीही ९ उपस्थले सांगितली आहेत. ती अशी. क्रियागमस्थल, भावागमस्थल, ज्ञानागमस्थल,



सकायस्थल, अकायस्थल, परकायस्थल, धर्माचलस्थल, भावाचरस्थल, आणि ज्ञानाचरस्थल.

**लिंगस्थलांतिर्गत प्रसादीस्थल**

या स्थलाचीही सिध्दांत शिखामणीमध्ये ९ च उपस्थले सांगितली आहेत. त्यांची नावे अशी. कायानुग्रहस्थल, इंद्रियानुग्रहस्थल, प्राणानुग्रहस्थल, कायार्पितस्थल, करणार्पितस्थल, भावार्पितस्थल, शिष्यस्थल, शुश्रुषुस्थल, आणि सेव्यस्थल.

**लिंगस्थलांर्तगत प्राणलिंगीस्थल**

या स्थलाचीही सिध्दांत शिखामणीत ९ च उपस्थले सांगितली आहेत. ती अशी. आत्मस्थल, अंतरात्मस्थल, परमात्मस्थल, निर्देहागमस्थल, निर्भवागमस्थल, नष्टागमस्थल, आदिप्रसादीस्थल, अंत्यप्रसादीस्थल, आणि सेव्यप्रसादीस्थल.

**लिंगस्थलांतर्गत शरणस्थल**

शिवयोगी शिवाचार्यांनी सिध्दांत शिखामणीत याची १२ उपस्थले सांगितली आहेत. ती अशी. दिक्षापादोदकस्थल, शिक्षापादोदकस्थल, ज्ञानपादोदकस्थल, क्रियानिष्पत्तीस्थल

भावनिष्पत्तीस्थल, ज्ञाननिष्पत्तीस्थल, पिंडाकाशस्थल, बिंव्दाकाशस्थल, महाकाशस्थल, क्रियाप्रकाशस्थल, भावप्रकाशस्थल, आणि ज्ञानप्रकाशस्थल.

**लिंगस्थलांतर्गत ऐक्य स्थल**

या स्थलाचीही ९ उपस्थले सिध्दांतशिखामणीत सांगितली आहेत. ती अशी. स्वीकृतप्रसादीस्थल शिष्टेदानस्थल, चराचरलयस्थल, भांडस्थल, भाजनस्थल, अंगलेपनस्थल, स्वपरज्ञानस्थल, भावाभावलयस्थल, आणि ज्ञानशून्यस्थल.

श्री १००८ भगवत्पाद काशी महास्वामी या अंगस्थल आणि लिंगस्थलाच्या वर्णनात शेवटी म्हणतात, 'श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी श्रीसिध्दांत शिखामणीमध्ये षट्स्थलसिध्दांताचे १०१ उपस्थलात अत्यंत सूक्ष्म असे विष्लेशण केले आहे. वीरशैव धर्मातील इतर कोणत्याही ग्रंथात असे विष्लेशण आढळत नाही. म्हणून हे विष्लेशण अपूर्व आहे असेच म्हणावे लागेल. यावरून असे दिसते की, शिवयोगी शिवाचार्यांनी स्वतःच १०१ उपस्थलांचे आचरण करून स्वानुभवाने ही मांडणी केली आहे. '



पुढे सदर प्रबंधात पूज्य महास्वामी म्हणतात ' षट्स्थलातील भक्त व माहेश्वर ही दोन स्थले क्रियाप्रधान असून जीव व इश्वर यातील भेद प्रतिपादन करीत आहेत. प्रसादी व प्राणलिंगी ही दोन स्थले क्रियेसहित ज्ञान व योग यांना प्राधान्य देणारी असून द्वैताद्वैत प्रतिपादन करतात. शरण व ऐक्य ही दोन स्थले ज्ञानप्रधान असून अद्वैत प्रतिपादक आहेत. म्हणून वीरशैव सिध्दांत द्वैत द्वैताद्वैत व अद्वैत या सर्व श्रुतींचा सुंदर समन्वय असल्यामुळे याला श्रुतिसमन्वयक सिध्दांत म्हटले जाते. '

आपण आतापर्यंत सूक्ष्म आगमातील षट्स्थलाचे विवरण पाहिले. नंतर सिध्दांतशिखामणीतील षट्स्थलाचे विवरण ही पाहिले. असेच षट्स्थलांचे विवरण श्रीशिवयोगी शिवाचार्यांच्यानंतर अनेकांनी अनेक भाषेतून केले आहे. पैकी मराठी भाषेतील संतशिरोमणी मन्मथ स्वामींनी 'परमरहस्यात' षटस्थलाचे विवरण कसे केले आहे ते पाहू.

**संतशिरोमणी मन्मथ स्वामींनी परमरहस्यात वर्णिलेले षट्स्थल.**

मन्मथ स्वामींचा ' परमरहस्य ' वा परमरहस्यसारामृत '

या नावाने प्रसिध्द असणारा टीका ग्रंथ ओवीबध्द असून त्याचे १७ अध्याय आहेत. हा ग्रंथ सर्व प्रथम इ. स. १८८७ साली बार्शी जि. सोलापूर येथे लिं. श्री. पारलिंग प्रभुअय्या यांनी अनेक हस्तलिखिते मिळवून संपादित करून छापून प्रसिध्द केला. त्यानंतर याच्याच अवृत्या कांही ठिकाणावरून काढल्या गेल्या. पुढे इ. स. १९६० च्या सुमारास लिं. श्री. १०८ शिवलिंग शिवाचार्य अहमदपूरकर महाराजांनी पुन्हा कांही हस्तलिखिते शोधून संपादित करून प्रकाशित केला. याच्याही अवृत्या निघत राहिल्या. त्यानंतर लिं. प्रा. डॉ. शेषनारायण पसारकरांनी या ग्रंथाची सुमारे आठ हस्तलिखिते जमा करून संपादन शास्त्राच्या पद्दतीने याचे सुयोग्य संपादन सिध्द केले. व शैवभारती शोध प्रतिष्ठान, जंगम वाडी मठ, वाराणसी यांनी इ. स. २००१ साली ते छापून प्रसिध्द केले. पुढे इ. स. २००८ साली श्री. १०८ निलकंठ शिवाचार्य धारेश्वर महाराजांनीही कांही हस्तलिखिते जमा करून संपादित करून हा ग्रंथ छापला. अलिकडे अनेकांनी या ग्रंथाच्या अवृत्या छापल्या आहेत.

पैकी श्री. १०८ निलकंठ शिवाचार्य धारेश्वर महाराजांनी



प्रसिध्द केलेल्या ' परमरहस्यसारामृत ' या ग्रंथात मन्मथ स्वामींनी १२ व्या अध्यायात षट्स्थलाचे विवरण केले आहे. ते येथे त्यांच्या ओवी रचनेतच देत आहे. हा ग्रंथ शिवपार्वती संवादात्मक आहे. यात माता पार्वती शिवाला प्रश्न विचारते,

पार्वती म्हणे देवा महेशा । षट्स्थळाचा नामरूप ठसा ।
निरोपावे स्वामी जगदीशा । कृपाळुत्वे ।। १७।।
गूढ रहस्य हे षट्स्थळ । सांगा जी मज निर्मळ ।
वीरशैवांचे आदिमूळ । अलभ्य जे ब्रह्मादिका ।। १८ ।।
ईश्वर म्हणे देवी ऐक । प्रथम भक्तस्थळ म्हणिजे एक ।
माहेश्वर दुजे नेमक । तिसरे ते प्रसादी। बोलिजे ।।१९।।
चौथे ते प्राणलिंगी जाणिजे। पाचवे ते शरण स्थळ ओळखिजे।
सहावे ऐक्यस्थळ बोलिजे। महा सत्यशरण।।२०।।
यांची नामे कळली तर्ही कांही।
परि याची स्थिती कळली पाहिजे पाही।
कळल्यावरी जैसाचि वर्तता होई। तरी तो सत्यशरण।।२१।।
हे एकांतीचे निजवर्म। पार्वती प्रश्न करी धरोनी प्रेम।
या षट्स्थळाची स्थिती उत्तम। ती निरोपा स्वामी।। २२ ।।
पार्वती पुसे शंकराशी। नमन करूनी चरणाशी।
एकेका स्थळाची कैसी। आचारणुक कोणेपरी ।।२३।।

शंकर म्हणे ओ पार्वती। षट्स्थळ ऐके प्रेम प्रीती।
त्यातुन प्रथम भक्ती। स्थळ निरोपू तुज।।२४।।
सदाचारे आचरे शिवभक्ती। तो आचार निरोपू प्रेमे प्रीती।
अनाचार न धरी अनुमात्र हाती। कोटी लाभ जोडे जरी।।२५।।
तरी अनाचार तो नकरी। आवडी गोडी अत्यंत शिवाचारावरी।
शिवावाचून ब्रह्मा हरी । न मानी कोणासी।।२६।।
जैसे पत्नीस भावभक्ती चित्त। आपुले पतीचे तिला व्रत।
म्हणोनी पतिव्रता निभ्रांत। नाम तियेचे।।२७।।
ती जैसे आपुले पतीविण। सर्वथा नकरी कोणाचे ध्यान।
वर्णिता न करी श्रवण। ती धन्य जाण पतीव्रता।।२८।।
तैसा न स्मरे शिवाविन आन । पूर्ण एकविधा भक्ती धरून ।
राहे सदा निष्ठेते ठेओन। हे भक्तिस्थळ उत्तम ।।२९।।
शिवावाचून कांही। ध्यानी मनी स्मरणी आन नाही।
शिवलांछन देखे ज्याचे ठाई। धावोनि पायी मिठी घाली।।३०।।
इतर देव असती शिवाचे सेवक । तया भजता दोष अनेक ।
भक्तिभावे अर्चिता नरक। प्राप्त होय श्रुतीवदे ।।३१।।
गुरू लिंग आणि जंगम। तिहिच्या पूजेचा एकचि नेम।
तिही एकभावे पूजी भक्तोत्तम। तो मुकुटमणी शिवाचाराशी।। ३२।।
एक मूर्ती त्रिभागा जाली भक्तकाजे । म्हणोनि गुरूंगजंगम बोलिजे।
तिन्ही एकची मानूनी पूजी ओजे। तोची भक्त उत्तम।।३३।।
जंगम लांछन देखोनि नयनी। अपुली परावी बगी न धरी मनी।



धावोनि लागे चरणी। भक्तस्थळ उत्तम या नाव।।३४।।
जंगमलिंगी भेद धरिता। अधेगती पावे तत्वता।
परमात्मभावे मानिता। पूजिता मोक्ष पावे।।३५।।
गुरूवचनी अविश्वास । शास्त्रवाक्या लावी दोष।
कुतर्की पांडित्य विशेष। अभक्त स्थळ हेचि।।३६।।
स्वधर्म पुराणा कंठाळत। परधर्म श्रवणा धावत।
तयाचे धर्म श्रेष्ठ मानित। अभक्तस्थळ तेचि।।३७।।
स्वधर्म सोडोनि आपुला। जरी उत्तम धर्म स्वीकारिला।
अधोगती नरक तयाला। स्वधर्म त्यागिताची।।३८।।
जैसे परस्त्री परधन। अनर्थासी होय कारण।
तैसे परधर्मी आचरण।घडे पातक सत्य पै।।३९।।
तीर्थासी विश्वास अत्यंत। लिंगजंगमी ठेवी चित्त।
ऐसे भक्तस्थळ थोडियाने बहुत। निरोपिले तुज देवी।।४०।।
आता माहेश्वारस्थळ तुज निरोपू निर्मळ।
जे ऐकता पातक सकळ। जळोनि जाय।।४१।।
आता माहेश्वरस्थळ महिमान। पार्वती ऐक विश्वास धरोन।
तयासी परस्त्री माते समान।काम नाही तयासी।।४२।।
का म्हणशी तरी ऐक। तयाशी आत्मा आत्मी नाही देख।
जे देखे ते शिवचि एक। तेथे आत्मा आत्मी कैची ।।४३।।
त्याशी स्त्रीचि दिसत नाही। जे देखे ते शिवचि पाही।
मा काम उठे तया कायी। भोग विषयासी।।४४।।

वीरनिष्ठ अंगी येता देख। तो करी सारासार विवेक।
मग वासनेचा पल्ला एकाएक। येईल कोठोनिया।।४५।।
तया परद्रव्य पाषाणा समान। परनिंदा हिंसा न करी आपण।
इत्यादि वर्जी सर्व अवगुंण। शुध्दभाव माहेश्वर तो।।४६।।
लिंगनिष्ठे निपुण करी पूजा। लिंग जंगमी भाव नाही दुजा।
गुरूभावने लिंगाशी पूजी ओजा। जंगमी तेचि निष्ठ।।४७। ।
गुरूशी भजे शिवभावना। ऐशा माहेश्वरस्थळाच्या खुणा।
आता प्रसादस्थळाची विवेचना। निरोपू ऐक ओ देवी।।४८।।
ऐक तिसरे प्रसादिस्थळ। प्रसाद सेवनी निष्ठ अढळ।
नित्य प्रसाद सेवी निर्मळ। भावे विश्वासे।।४९।।
जंगम परब्रह्मचि मानिजे।त्याचा प्रसाद लिंगमुखे सेविजे।
तृणही लिंगाशी दाविजे। मग स्वये सेविजे आपण ।।५०।।
प्रसादा गोड कडू बहू थोडे। जे म्हणती ते केवळ वेडे।
शिवगणी मिरवी कोण्या तोंडे। नित्य गोडी नेणे प्रसादाची।।५१।।
प्रसाद न मिळे धर्मभ्रष्ठ। जो करी पर धर्माचा साठा।
कुतर्की पाखांडी मतश्रेष्ठ। प्रसाद वर्ज असे पै।।५२।।
प्रसाद महिमा विशेष। होतसे ऋिध्दीसिध्दी वश।
वेद चर्चा प्राप्त श्वानास। प्रसादाने घडलीसे।।५३।।
अनर्पित ते न अर्पिजे । कठीण अंश तो सोडोन देईजे।
आपपर जंगमी न लेखिजे। भावे सेविजे प्रसाद।।५४।।
प्रसादा विन्मुख न घडे कधी। प्रसाद लिंगार्पित करी आधी।



भावे सेविता प्रकाशे बुध्दी । अष्टमहासिध्दी ओळंगती अंगणी।।५५।।
हे लटिके म्हणशी तरी ऐक। अष्टमहासिध्दीचे काय कौतुक।
श्वानमुखे वेद वदविला देख। अष्ठासिध्दी त्या किती ।। ५६।।
प्रसादनिष्ठ जयाशी पूर्ण असे। तो वंदिजे म्या महेशे।
त्याचे दर्शन घे विश्वासे। तो पुण्यपुरूष भाग्याचा।। ५७।।
ऐसा प्रसाद निष्ठेचा नेम। तुज दाविला निरूपम।
आता प्राणलिंग उत्तम। चौथे स्थळ ते ऐक।।५८।।
प्राणलिंगस्थळाचे ऐक निरूपण।लिंगी ऐक्य प्राणगुणेकरोन।
प्राण तो लिंगी लयात नेओन। लिंग प्रण एक झाला।। ५९।।
लिंग तो प्राण प्राण तो लिंग। उभयाचे एक असे अंग।
म्हणोनि लिंग गेलिया मग। देह केवी राहे।।६० ।।
भानू अस्तमानी किरण जाये। दीप गेलिया प्रकाश केवी राहे।
तैसा लिंग गेलिया प्राण पाहे। राहू शके केवी देवी।।६१।।
आत्मा गेलिया देह जरी राहे। तरी लिंग गेलिया प्रणलिंगी ठाये।
यालागी प्राणलिंगी न राहे ।लिंग गेलिया वरी।। ६२ ।।
अखंड त्याचा प्राण। लिंगी असे हाओनि मग्न।
यालागी प्राणलिंग नामाभिदान। शोभे तयाशी।।६३।।
तो लिंगरूप हावोनि असे। म्हणोनि तया सुख दुःख भय नसे।
तो सुख दुःखाविरहित वसे। निर्भय होओनिया।।६४।।
सुख झालिया फुगेना । दुःख झालिया उतरेना ।
कळीकाळाशी तो भिईना। निष्ठेचेनि बळे।। ६५।।

जो स्वयेची रावो जाहला। तो काय भियील सेवकाला।
तैसा तो लिंग होवोनिया ठेला। त्या काळ यम कैचा।।६६।।
प्राणलिंगी तत्व समाधी । लिंगी प्राण अर्पी सुधी।
कायशी तया मृत्यू उपाधी। अमर असे जगी तो।।६७।।
म्हणेनि लिंगधारी दहन। करणे गोत्रहत्या जाण।
स्वयं समाधिस्थ म्हणोन। समाधीच करिती तया।। ६८।।
हा शिवधर्म परम पावन। साधन करिता साध्य होय जाण।
जो असे वीरशैव कुलोतपन्न। जाणे मर्म गुरूकृपे।।६९।।
ऐसे हे प्राणलिंगी स्थळ।तुज निरोपिले सकळ।
आता शरणस्थळ निर्मळ। निरोपू पाचवे ते ।।७०।।
ऐक शरण स्थळाचे महिमान। लिंगाशी स्वपती करोन।
आपण सती होई शरण। प्रेम तयाशी धरोनी।।७१।।
सती पती जैसे एक असती। येर येराशी भेद न धरिती।
तैशी लिंगी अती प्रीती। युक्त होओनि असे।।७२।।
सती पतीची शरिरे वेगळी दिसती।
परी आत्मत्वे एक होओनी असती।
तैसे लिंगी शरण स्थिती। होओनि असे।। ७३।।
देखोनिया सत्य शरण। दंडप्रमाण शरण।
किंकरवृत्ती निरभिमान। म्हणेनि शरणस्थळ नाम हे।।७४। ।
पाची इंद्रियाचे सुख अथवा दुःख। अणुमात्र नाही देख।
लिंगसुख सुखदायक। होओनी असे ।।७५।।



लिंगसुखी तो रत झाला। त्रिकाळ पूजा करू लागला।
अखंड अहर्निशी रमो ठेला। लिंगी लीन होओनी।।७६।।
ज्याचे मुखी अखंड अमृत वाटी। तो काय कांजीसी लाळ घोटी ।
लिंगसुख सोडोनी विषयासाठी।रंक नव्हेची तो।।७७।।
वोकिल्या वोकाशी। परतोनी कोन्ही न सेवी त्याशी।
तैसा नघे विषयाशी। शरणस्थळ उत्तम।।७८।।
श्रीगुरूची सेवा करावया। सदा देह ठेविला पाया।
तोडिली संसृतीची माया। तया शरण म्हणावे।।७९। ।
पतिवृता पतीचे वचनाशी। न टळे सदा सावध जैशी।
तेवी लिंगपूजा गुरूदर्शनाशी। न टळे कालत्रयी।।८०।।
ऐसा लिंगमोही विषय त्यागी। ते शरणस्थळ निरोपिले तुजलागी।
आता ऐक्यस्थळ उत्तम मार्गी। निरोपू तुज सहावे।।८१।।
ऐक्यस्थळ तें सहावे। षडुर्मि वेगळे असे स्वभावे ।
षड्वर्गाशी ते ना गवे। निरंजन मूर्ती।।८२।।
सुखदुःख मानापमान। नाही आपपर निरभिमान।
क्षुधा तृष्णा शीत उष्ण। लागता न डळमळी तो।।८३।।
काम क्रोध लोभ दंभ मोहो। जयाकडे न लभे पाहो।
मदमत्सर सर्व विकार समुहो। अणुमात्र विटाळ न तयाचा।।८४।।
मी तू हे नाही कधी।आशा मनिषा विषय कुबुध्दी।
न घे आलिया अष्टमहासिध्दी। शरणांगत वीर ।।८५।।
तो स्वयेचि वस्तू होओनी असे। या लागी जरामरण आठवतू नसे।

मा देहबुध्दी तया असे। हे केवी घडे ।।८६।।
जेथ देहबुध्दीची नाही। तेथे अष्टविधार्चन पूजा कांही।
पूज्य पूजक पूजा आपण पाही।होओनी ठेला।।८७।।
तो भवभया विरहित।न करी लौकिक गोष्टी मात।
न मिरवी जाणीव शाहाणीव व्युत्पत। लिंगी रत होओनी असे।।८८।।
तो लिंगी मिळोनी कैसा गेला। जैसा कर्पूर अग्निरूपची झाला।
तैसा लिंगी मिळोनी ठेला। लिंग होओनी तो।।८९।।
भूता कृती भिन्न देखेना। त्रिभुवनी देखे आप आपणा।
विश्वी ऐक्य आपणा। पाहे म्हणोनी ऐक्यस्थळ तो।। ९०।।
तो निजरूप निरालंब भरित। निर्विकल्प निरंजन मूर्त।
निजानंद निर्धूत। निरामय तो।।९१।।
तो निराश निःसंग। अनुपम्य अनुरागी अनंग।
अनाम अप्रमेय निजांग। होओनी असे।।९२।।
तो शिवतत्वी मग्न होओन। ईश्वररूपे राहे आपण।
अज्ञ जनाते उध्दरून।निज मार्गा लावितसे।।९३ ।।
शिवपूजा शिवस्मरण। करिता नसे त्याशी भान।
शिवतत्वाची मुख्य खूण। लीन जाण तेथेचि।।९४।।
तया जरा मरण नाही। तो अमर असे विदेही।
योग्याभ्याशी सदाही। पूर्णत्व पावला।।९५।।
सर्व नाडीचे शोधन करोन। जेथिचे तेथेचि खुंटवोन।
दश दिशाप्रती शोधून। दशद्वारा अकर्षी। ।९६।।



प्राण व्याप्त शरिरा भीतरी। तो काढोनि ब्रह्मरंध्री।
प्रविशितसे निर्धरी। कोटी चंद्रसूर्यप्रभा जेथे ।।९७।।
तेथे धीर धरूनि उघडीता नेत्र । तो तया प्रभेच्या परत्र।
अतिसूक्ष्म न वर्णवे अणुमात्र। ज्योती पवित्र दिसतसे।।९८।।
तो मार्ग परम कठीण।मना प्रवेश नोव्हे जाण।
म्हणोनिया योगी उन्मन। म्हणती तया।।९९।।
तेथे गुरूचे न चाले । कोण्या उपाया न हाले ।
एक निश्चल तत्व डोले । स्वरूपी अखंड।। १००।।
त्या दृष्टीचे आवरण । अति सुदृढ म्हणेन।
जरी मागे न पाहे परतुन। तरीच चढे पुढती ।।१०१।।
विद्युत चपलगती आत्मदृष्टी ।चमकोनी मिळे ज्योती पोटी।
मागुती चढोनी ये त्रिपुटी। उठाउठी भेटतसे ।।१०२।।
जिवा शिवा पडल्या गाठी। हीच असे ऐक्यता मोठी।
तत्वाविना तेथे सृष्टी। उद्भव होय जाण ।।१०३।।
हा जाणिजे ऐक्य योग। जो करी लिंगार्चन सांग।
तो ऐक्य स्थळाचा मार्ग। पावला निश्चये।।१०४।।
तोचि सद्गुरू शिवाचाराशी।आणि तारक विश्वजनाशी।
जो पूजी ऐशीया विश्वासेशी। तो होय तद्रूपची।।१०५।।
त्याचे मुखीचा प्रसाद चरणीचे तीर्थ ।
विश्वासे सेविता अधोगती चुकत।
तो परब्रह्म भावना निभ्रांत। भाविजे निजभक्ती।।१०६।।

जो जयाकडे कृपादृष्टी पाहे। तयाशी सुखाची दिवाळी होय।
तयाचे कळीकाळ वंदिती पाय। मा इतरांचे भय काय तया ।।१०७।।
ते परब्रह्मचि मुसावले। भक्तिसुखालागी अवतरले।
वीरशैव नाम पावले। ऐक्यस्थळ ते।। १०८।।
त्या स्थळी सत्यशरण। असती तेचि होवोन।
ते मजही होती पूज्यमान। षट्स्थळ ते।। १०९।।
हे ऐक्य स्थळ सहावे। तुज निरोपिले प्रेमभावे।
ऐसे ऐकोनी आनंदली जिवे। मग प्रश्न करिती झाली पुढारी।।११०।।

अशा प्रकारे मन्मथ स्वामींनी षट्स्थळाचे वर्णन केले आहे. या वर्णनात कोठेही लिंग षट्स्थळ, अंग षट्स्थळ असे विभाजन आलेले नाही. मात्र वर आपण आगमातील षट्स्थळात अंगस्थळाची व लिंगस्थळाची विभाजित एकंदर ५४ उपस्थळे पाहिली आहेत. तर सिध्दांत शिखामणीत अंग आणि लिंग स्थळाची मिळून चक्क १०१ उपस्थळे पाहिली आहेत.

या दोन्ही रचना मन्मथ स्वामींच्या खूप पूर्वीच्या आहेत. मन्मथ स्वामींनी या रचना पाहिल्या असतील. कारण माणूर मठाचा ग्रंथसंग्रह त्यांना उपलब्ध होता. त्यासंग्रहात आगम



व सिध्दांतशिखामणी असतीलच. असे असेल तर मग मन्मथ स्वामींनी षट्स्थळाचे अंगस्थळ व लिंगस्थळ असे विभाजन करून उपस्थलात हा सिध्दांत का मांडला नसेल?

आपण पाहिले आहे की, असे विभाजन करून उपस्थलात विभागून मांडलेला हा सिध्दांत समजण्यास बराच किचकड वाटत आहे. सर्वसामान्य वीरशैव मराठी जनास विभाजित सिध्दांताचे आकलन सहज असणार नाही.

मन्मथ स्वामींच्या काळाचा विचार केला तर असे दिसून येतेकी, वीरशैव धर्म त्यांच्या काळात लयाला चाललेला होता. इस्लामी राज्यकर्ते आणि भक्तीचे सोपे आचरण व तत्वज्ञान सांगणारा वारकरी पंथ यांच्या तावडीत सापडलेले वीरशैव आपला स्वतःचा धर्म विसरत चालले होते. वीरशैवांच्या मनात भीती उत्पन्न झाली होती. म्हणूनच तर मन्मथ स्वामींचे दिक्षा, शिक्षा गुरू माणूर मठाधीश श्री १०८ बसवराज महाराजांनी मन्मथ स्वामींना शाहिरी सोडून वीरशैव तत्वज्ञानपर लेखन करण्याची अज्ञा दिली होती. स्वतः मन्मथ स्वामींनीही ‘ मन्मथ आलासे भूलोका। आता कुणी भिऊ नका। ’ असे म्हटले आहे. अशा परिस्थितीत वीरशैव

धर्माचे सोपे तत्वज्ञान संस्कृत पंडितांचे अनुकरण करून विश्लेषण पद्दतीने सांगून उपयोग झाला नसता. म्हणून सारांशाने षटस्थळ अत्यंत सोप्या भाषेत मांडले असावे. सोप्या भक्तिमार्गी वारकऱ्यांकडे अकर्षित झालेल्या वीरशैवांना वीरशैवांचाच सोप, सुलभ भक्तिमार्ग सांगणे हाच मन्मथ स्वामींचा हेतू होता. तो नक्कीच साध्य झाला आहे.

एकंदर अष्टावरण, पंचाचार, षट्स्थल या वीरशैव सिध्दांताचे स्वरूप थोडक्यात पण संपूर्ण सांगण्याचाच माझाही हेतू आहे. तो कितपत साध्य झाला हे वाचकच ठरवितील.

❖❖❖



**प्रा. डॉ. भी. शि. स्वामी यांची**
**इतर ग्रंथ संपदाः–**

**कथा संग्रह –**

१, दिशा

२. रचना आणि इतर कथा

**कादंबरी –**

१. गणूराया, २. प्रजा

३. श्री १००८ भाग १ , २, ३,

**प्रबंध –**

लक्ष्मण महाराज : व्यक्ती आणि वाङ्मय

**इतिहासपर –**

वीरशैव चळवळीतील परंडकर मठाचे योगदान

समिक्षात्मक – मन्मथ स्वामींची अभंगवाणी.

**संपादित –**

श्रीलक्ष्मण महाराज विरचित शिवभक्त कथा

**प्रकाशनाच्या प्रतिक्षेत**

**ललित लेखन–**

आपुलाचि संवाद आपणाशी

कादंबरी –

१. गड्या आपुला गाव बरा

२. केल्याने होत आहे रे !

३. ओहळला रे ओहळला!

गिरीधर सुगंध नाटक, वैचारिक लेख संग्रह, कांही ग्रंथ परिचसात्मक लेखन व व्यक्तिचित्रे. आणि सोनेसांगवी ते पुणे व्हाया बार्शी, औरंगाबाद, औसा. हे आत्मचरित्र.

❖❖❖



*आत्मा त्वं गिरिजा मतिः*
*सहचराः प्राणः शरीरं गृहम्*
*पूजा ते विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः ।*
*संचारः पदयोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वा गिरो*
*यद्यत् कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ॥*

तूच आत्मा आहेस आणि मती वा बुध्दी म्हणजे तुझी सहचारी गिरिजा म्हणजे पार्वती आहे. माझे प्राण आणि शरीर तुमचे घर आहे. मी जे विषयाचे भोग घेतो ज्या रचना वा कृती करतो ते भोगच व कृतीच तुझी पूजा आहेत आणि माझी निद्रा हीच तुझी समाधी अवस्था आहे.

मी माझया पायांनी जो फिरतो तीच तर तुझी प्रदक्षिणा आहे आणि माझा सर्व वाणीचा उच्चार हेच तुझ्या स्तुतीचे स्तोत्र आहे. मी जी जी कार्ये करतो ती सर्व तुझी आराधनाच आहे.

❖❖❖

आत्मा त्वं गिरिजा मतिः
सहचराः प्राणः शरीरं गृहम्
पूजा ते विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः ।
संचारः पदयोः प्रदक्षिणाविधिः स्तोत्राणि सर्वा गिरो
यद्यत् कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ॥